राज्यकर आयुक्त महाराष्ट्र राज्य
मुंबई यांचे कार्यालय, ८ वा मजला,
नवीन इमारत, वस्तू व सेवा कर भवन,
माझगांव, मुंबई - ४०० ०१०.

संदर्भः - १. कार्यालयीन आदेश क्र.विविआ/ म.रा./ पुनर्रचना कक्ष/ प्र.क्र.६०/ अपिले कार्यभार/ ब-४३०, दि.०३.०५.२०१२

२. कार्यालयीन आदेश क्र.-विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६, दि. १७/१२/२०१५.

३. कार्यालयीन आदेश क्र. विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६ दि. २८/११/२०१६

४. शुध्दीपत्रक क्र.-विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६ दि. ३०/११/२०१६.

५. कार्यालयीन आदेश क्र. विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६ दि. २१/१२/२०१६.

६. कार्यालयीन आदेश क्र.-विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६, दि.०५/०१/२०१७.

७.कार्यालयीन आदेश क्र.-विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६, दि. २८/०२/२०१७

८. कार्यालयीन आदेश क्र.-विविआ/२०१७/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/ प्रशासकीय बदल/प्र.क्र.९२, दि. २८/०४/२०१७

९.कार्यालयीन आदेश क्र.-विविआ/२०१७/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/ प्रशासकीय बदल/प्र.क्र.९२, दि. १६/०५/२०१७

## कार्यालयीन आदेश

क्र.-विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६, मुंबई दि. 8 NOV 2017

**प्रस्तावना**

१. उपरोक्त संदर्भ क्र. २ मधिल आदेशान्वये बदललेल्या अपिल कार्यपध्दतीच्या संबंधात निर्देश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने संदर्भ क्र. २ ते ७ मधिल आदेशांन्वये, वेळोवेळी मार्गदर्शनपर सुचना देण्यात आल्या आहेत.

२. उपरोक्त संदर्भ क्र. २ मधिल आदेश निर्गमित करतेवेळी अपिल दाखल करतानाच त्यासोबत अंशतः भरणा करणे अनिवार्य नव्हते.

३. आता महाराष्ट्र कर विषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम २०१७ ( सन २०१७चे विधानसभा विधेयक क्र. १८) अन्वये महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर कायदा २००५ च्या कलम २६ मध्ये उपकलम (६क) नव्याने अंतर्भूत करण्यात आले असून त्यानुसार दि.१५ एप्रिल २०१७ रोजी किंवा त्यानंतर पारित करण्यात आलेल्या आदेशांविरुध्दचे अपिल दाखल करताना त्यासोबत नियमानुसार अंशतः भरणा केल्याचा पुरावा जोडणे अनिवार्य आहे. या संदर्भात Trade Circular No. VAT/ AMD-२०१७/ १A /२ / Adm-८ Trade Circular No. ११ T of २०१७ Dt. २०/०४/२०१७ देखील जारी करण्यात आले आहे.

४. महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर कायदा २००५ च्या कलम २६ मध्ये नव्याने अंतर्भूत करण्यात आलेले उपकलम (६क) विचारात घेवून व शासन निर्णय, क्रमांक विकवि-१२१६/प्र.क्र.४/वि.प्र.४, दि. २४/०१/२०१७ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन, खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**आदेश**

बदललेल्या अपिल कार्यपध्दतीच्या संबंधात संदर्भ क्र. २ च्या आदेशान्वये दिलेले निर्देश तसेच संदर्भ क्र. ३ ते ७ मधिल आदेशांन्वये, वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शनपर सुचना, दि.१५ एप्रिल २०१७ रोजी किंवा त्यानंतर पारित करण्यात आलेल्या आदेशांविरुध्दच्या अपिलांबाबत लागू असणार नाहीत. मुंबई व पुणे कार्यालयात विक्रीकर उपायुक्त यांनी पारीत केलेल्या संविधानिक आदेशाविरुध्द दाखल होणारी अपिले संदर्भ क्र. २ मधील दि. १७.१२.२०१५ च्या आदेशानुसार घोषित करण्यात आलेल्या संबंधित विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांच्याकडे पूर्वीप्रमाणेच दाखल करण्यात यावीत. तसेच विक्रीकर अधिकारी व सहाय्यक विक्रीकर आयुक्त यांनी पारीत केलेल्या संविधानिक आदेशाविरुध्दची अपिले संदर्भ क्र. ८ मधील दि. २८.०४.२०१७ व संदर्भ क्र. ९ मधील दि. १६.०५.२०१७ च्या आदेशानुसार मुंबई व पुणे कार्यालयासाठी घोषित करण्यात आलेल्या विक्रीकर उपायुक्त (अपिले) यांच्याकडे दाखल करण्यात यावीत. त्याचप्रमाणे मुंबई व पुणे वगळता इतर विभागात पारीत होणाऱ्या संविधानिक आदेशाविरुध्दची अपिले संदर्भ क्र. १ मधील दि. ०३.०५.२०१२ च्या आदेशानुसार घोषित करण्यात आलेल्या संबंधित विक्रीकर उपायुक्त (अपिले) व विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचेकडे दाखल करण्यात यावीत. अपिल दाखल करुन घेताना व्यापा-याने नियमानुसार अंशतः भरणा केल्याची खातरजमा अपिल प्राधिका-यांनी करावी.

दि.१५ एप्रिल २०१७ पुर्वी पारित केलेल्या आदेशांविरुध्द दाखल केलेल्या किंवा दाखल करण्यात येत असलेल्या अपिलांच्या बाबतीत यापूर्वी उपरोक्त क्रमांक २ ते ७ आदेशांन्वये वेळोवेळी दिलेले निर्देश व मार्गदर्शनपर सुचना यापुढेही लागु असतील.

**राज्यकर आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

प्रत:-

१. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. अपर पोलीस महासंचालक व मुख्य दक्षता अधिकारी, महाराष्ट्र राज्य मुंबई.
३. अप्पर राज्यकर आयुक्त, मुंबई- १, २, ३, ४/ठाणे/नाशिक/कोल्हापुर/नागपुर/ठाणे.
४. सर्व राज्यकर सहआयुक्त.
५. आयुक्तांच्या कार्यालयातील सर्व कार्यासने.
६. सर्व राज्यकर उपायुक्त, सहायक राज्यकर आयुक्त आणि राज्यकर अधिकारी.
७. सर्व आस्थापना अधिकारी.
८. निवडनस्ती.
९. स्थळप्रत.